संदर्भ - शासन निर्णय क्रमांक : जिवायो-२०११/प्र.क्र. /पदुम-४, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ११ नोव्हेंबर २०११

जावक क्रमांक : पशुधन-३/जि.शे.ग.वा.यो. /२०४०-२११५/२०१३, पसं-१३, पुणे-०७, दिनांक ३०/०५/२०१४.

**मार्गदर्शक सूचना २०१४-१५**

१. **उपरोक्त शासन निर्णयामधील सर्वसाधरण मार्गदर्शक सूचना, अटी, शर्ती व अनुदान रक्कमेच्या मर्यादेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.**

२. लाभार्थ्यांच्या अर्जाचा नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे. नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत प्राप्त अर्जांपैकी ज्या लाभार्थ्यांची निवड झालेली नाही व जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी योजनेंतर्गत लाभ घेण्यास तयार आहेत अशा लाभर्थ्यांना संदर्भिय शासन निर्णयातील निकषान्वये व त्यांच्या निवड यादीतील क्रमानुसार व तरतुदीस अधिन राहून लाभार्थ्यांची संख्या निश्चित करुन लाभ देण्यासाठी निवडावे.

३. लाभार्थी निवडताना **३ टक्के लाभार्थी विकलांग** प्रवर्गातील असावेत.

४. लाभार्थी निवडताना **३० टक्के महिला लाभार्थी** निवडीस प्राधान्य देण्यात यावे.

५. लाभार्थ्याकडून घ्यावयाच्या बंधपत्रचा मसुदा सोबत जोडला आहे. त्यानुसार शेळीगट प्रत्यक्ष खरेदी करण्यापूर्वी लाभर्थ्याकडून बंधपत्र करुन घ्यावे.

६. सदरचा शासन निर्णय व अनुषंगिक मार्गदर्शक सूचना पशुसंवर्धन खात्याच्या संकेतस्थळावर (www.ah.adfmaharashtra.in) उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

७. योजनेंतर्गत शेळी गटास आवश्यक निवारा, पुरेसा चारा, खाद्य व पाणी याची व्यवस्था लाभार्थ्याने स्वबळावर करावी.

८. लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर व त्यांनी स्वतःच्या हिश्याची रक्कम उभारुन त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर शेळीगट (उस्मानाबादी / संगमनेरी / अन्य स्थानिक प्रजातीच्या) खरेदीसाठी विहीत शासकीय अनुदानाची रक्कम संबंधित बँकेकडे (लाभार्थींच्या कर्ज खात्यात) वर्ग करण्यात यावी.

९. जे लाभार्थी बँके मार्फत कर्जाची रक्कम उभारणार नाहीत व स्वत: रक्कम उभी करतील, अशा लाभार्थ्यांच्या हिश्शाच्या रक्कमेचा धनाक र्ष (डीमांड ड्राफ्ट) योजनेचे अंमलबजावणी व आहरण-सवितरण अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांचे नावे काढावा. खरेदीच्या वेळी लाभर्थ्याच्या हिश्शाची रक्कम व शासकीय अनुदानाची रक्कम असा एकत्रित निधि पशुधनाची खरेदी करणा-या समितीमधील संबंधित पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांच्याकडे सुपुर्द करावा.

१०. शेळी गट समितीमध्ये अंतर्भूत असलेले अन्य सदस्य यांनी शेळी गट खरेदी करण्यासाठी केलेल्या प्रवासाचा खर्च स्वत: करायचा आहे.

११. शेळी गट खरेदी केल्यानंतर या जनावरांची लाभार्थीच्या गावापर्यंत वाहतूक व आवश्यकतेनुसार शेळी गटाच्या ट्रांझिट विम्याचा येणारा खर्च लाभार्थी नी स्वत: करावयाचा आहे.

१२. योजनेमध्ये वाटप केलेल्या जनावरे मृत झाल्यास विम्याच्या पैशातुन संबंधित प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांच्या मान्यतेने लाभार्थ्यांना दुसरे जनावर खरेदी करु न पुरवण्यात यावे.

१३. लाभार्थ्यांनी शेळीपालन / संगोपनाचे प्रशिक्षण घेतलेले नसल्यास एक दिवसाचे निःशुल्क प्रशिक्षण शक्यतो जिल्हा / तालुका स्तरावर देण्यात यावे.

१४. वनक्षेत्रा नजीकच्या कार्यक्षेत्रांतर्गत लाभार्थी ची निवड करताना त्यांना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत अवगत करावे.

१५. योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मासिक, त्रैमासिक, वार्षिक व फलनिष्पत्ती अहवाल जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांचे मार्फतीने खात्यास सादर करावा. राज्य स्तरावर आयुक्त पशुसंवर्धन योजनेचे सनियंत्रण करतील.

१६. योजनेची देयके आहरित करताना लाभधारकांची यादी निश्चित करु न योग्य त्या तपशीलासह देयतासोबत जोडल्याशिवाय अनुदाने आहरित करण्यात येउ नये.

१७. योजनेचा अहवाल अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन यांचे अभिप्रायासह वार्षिक प्रशासन अहवालामध्ये समावेश करण्याची जबाबदारी सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) यांची राहील.

१८. सन २०१४-१५ मध्ये वितरीत निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र पुढील आर्थिक वर्षाच्या एप्रिल महिन्यात सादर करणे बंधनकारक राहिल.

१९. आर्थिक वर्ष संपल्यानंतर योजनेच्या विभागीय स्तरावर मुल्यमापनासाठी समिती खालीलप्रमाणे आहे. तसेच आदिवासी उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना अंतर्गत प्रस्तुत योजनेच्या लाभार्थ्यांची यादी, खर्च व मुल्यमापन अहवाल आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक तसेच अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग व प्रकल्प अधिकारी यांचेकडे पाठवावा.

२०. **विभागस्तरावरील प्रस्तुत योजनेची मुल्यमापन समिती**

| | |
|---|---|
| १. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त | अध्यक्ष |
| २. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त मुख्यालयाचे | सदस्य |
| ३. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालय | सदस्य |
| ४. प्रक्षेत्र व्यवास्थापक, विभागातील शेळी-मेंढी महामंडळाचे प्रक्षेत्र | सदस्य |
| ५. पशुधन विकास अधिकारी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालय | सदस्यसचिव |

२१. राज्यस्तरावर आयुक्त पशुसंवर्धन हे योजनेचे मुल्यमापन करून अभिप्रायासह अहवाल शासनास सादर करतील.

सहपत्र - वरीलप्रमाणे

**आयुक्त पशुसंवर्धन**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-०७**

**प्रतः- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे-१६ यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

(३ ते ९) मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, विभाग सर्व.

(१० ते ३९) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सर्व.

(४० ते ७३) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सर्व.

(७४) कार्यासन अधिकारी पसं ६ यांना माहितीसाठी..

## निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांकडून घ्यावयाच्या बंधपत्राचा नमुना

मी श्री./श्रीमती/कु.-------------------------रा. ------------------ ता. ------------------ जि. ------------------ प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो/देते की, जिल्हा पशुसंवर्धक उपआयुक्त, -------------------------- यांचेकडून महाराष्ट्र राज्य शासनाच्या पशुसंवर्धन खात्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या **जिल्हास्तरीय अनुसूचिचत जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने अंतर्गत १० अ १ शेळी गट पुरवठा अंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जिल्हा ------------------------- यांचेमार्फत आज दिनांक ------------------- रोजी माझे प्रकरण मंजूर झाले असून, त्यानुसार मी शासनाने विवहीत केलेल्या पध्दतीस अनुसरुन मला लागू असलेल्या ७५ टक्के अनुदानावर १० + १ शेळी गट खरेदी करीन.**

१. सदर योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या शेळया तसेच बोकडांचे योग्य तऱ्हेने पालनपोषण करुन माझ्या कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढविवण्यासाठी त्यांचा उपयोग करेन.

२. अनुदानवर प्राप्त झालेल्या गटातील शेळया व बोकड पशुसंवर्धन खात्याच्या अधिकाऱ्यांना तपासणी करीता आवश्यक त्या वेळेस दाखविण्याची जबाबदारी माझ्यावर आहे व मी ती पार पाडेन.

३. अनुदानावर प्राप्त झालेली शेळया/बोकड आजारी पडल्यास अथवा पशुवैद्यकाची गरज पडल्यास नजिकच्या पडल्यास पशुवैद्यकीय दवाखान्यात घेऊन जाईन व त्यांच्या सल्ल्यानुसार उपचार घेईन.

४. या योजने अंतर्गत प्राप्त झालेली जनावरे ३ वर्षे योग्य रितीने सांभाळणे व त्यापासून शेळीपालन व्यवसाय करणे माझ्यावर बंधनकारक आहे. या दरम्यान विमा काढलेल्या जनावरांचा विम्याचा बिल्ला कानातून पडल्यास त्याबाबत त्वरीत बँक/विमा कंपनी/पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांना कळविणे माझेवर बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.

५. अनुदानावर प्राप्त झालेल्या शेळया/बोकड मृत पावल्यास नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यास सूचित  करून मृत जनावराचे शवविच्छेदन करून व विमा रकमेतून त्या ऐवजी शेळया/बोकड खरेदी करणे माझेवर बंधनकारक राहील.

६. अनुदानावर प्राप्त झालेल्या जनावरांना साथीच्या रोगांपासून संरक्षण मिळण्यासाठी वेळोवेळी लसीकरण करून घेण्याची जबाबदारी माझ्यावर राहील.

७. मी अनुदानावर प्राप्त झालेली जनावरे पशुसंवर्धन खात्याचे अधिकऱ्यांच्या परवानगी शिवाय विकणार नाही.

८. आम्ही पती/पत्नीपैकी कोणीही शासकीय/निम शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवानिवृत्त नाही.

९. मला या अथवा तत्सम (शेळी गट वाटप) योजनेचा लाभ मिळालेला नाही.

१०. या योजनेमध्ये मला देण्यात आलेल्या शेळया/मेंढया या मी वनक्षेत्रात चराईसाठी सोडणार नाही व वन व पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेईन.

**या बाबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून, शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाचा मी गैर उपयोग केल्याचे आढळून आल्यास माझेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची मला जाणीव आहे .**

साक्षीदाराची स्वाक्षरी, नाव
व पूर्ण पत्ता

लाभार्थीची स्वाक्षरी:
लाभार्थीचे नाव:

**१.**
**२.**

प्रतिस्वाक्षरीत
पशुधन विकास अधिकारी (विस्तार)

पंचायत समिती -------------

ता. -------------------- जिल्हा -----------------

**जिल्हास्तरीय अनुसूचिचत जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने अंतर्गत १० + १ शेळी गट पुरवठा करणे**

**<u>लाभार्थीने करावयाच्या अर्जाचा नमुना</u>**

मागील ३ महिन्यांतील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र येथे चिकटवावे

१) अर्जदाराचे नाव : श्री./श्रीमती ----------------------------------------

(फोटो ओळखपत्रची सत्यप्रत जोडावी)

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : गावाचे नाव (मु.पो.) ------------------------------------------

तालूका -----------------------जिल्हा---------------------पिनकोड-------------

संपर्कासाठी अर्जदाराचा दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र --------------------

३) अर्जदाराचे वय: (पूर्ण वर्षामध्ये) ----------

४) लिंग: स्त्री/पुरुष (लागू असेल त्यावर √ खूण करावी)

असल्यास दारिद्ररेषेखली असल्याचा दाखला जोडावा.

५) कुटुंब सदस्य संख्या : पुरुष------ महिला------ एकूण------

६) अर्जदाराच्या मालकीची स्वतःची शेतजमीन आहे का? होय/नाही (लागू असेल त्यावर √ खूण करावी) असल्यास तपशील: ---------------- एकर---------------- गुंठे (७/१२ उतारा जोडावा) अर्जदाराची स्वतःची जमीन नसल्यास शेळयांसाठी वाडा बांधावयाच्या जागेचा ७/१२ उतारा व जमीन मालकाचे संमतीपत्र जोडावे. चारापिके घेण्यासाठी सिंचन व्यवस्था उपलब्ध आहे का? होय/नाही (लागू असेल त्यावर √ खूण करावी)

७) अर्जदाराकडे सध्या उपलब्ध असलेल्या पशुधनाचा तपशील:

| अ. क्र. | तपशील | संख्या | अ. क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | संकरीत गायी | | ४ | मुरा/मेहसाना/सुरती म्हशी | |
| २ | गावठी गायी | | ५ | शेळया - उ.बादी, संगमनेरी, स्थानिक | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | शेतीकाम/ओढकामाचे बैल | | ६ | मेंढया - डेक्कनी, माडग्याळ | |

८) अर्जदाराकडे शेळयांसाठी वाडा उपलब्ध आहे का : होय/नाही

असल्यास किती जनावरांसाठी ----------------

अस्तित्वातील वाडा प्रकार: कच्चे बांधकाम/पक्के बांधकाम/गवती छपराचे छप्पर

(लागू असेल त्यावर √ खूण करावी)

९) अर्जदाराने शेळीपालन विषयक प्रशिक्षण घेतले आहे का? : होय/नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील ---------------------------------------------------

(असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी)

१०) अर्जदार अनु. जाती/आदिदवासी प्रवर्गातील आहे का? : होय/नाही (लागू असेल त्यावर √ खूण करावी) असल्यास जातीच्या दाखल्याची प्रत जोडावी.

११) अर्जदार बचत गटाचा सदस्य आहे का? : होय/नाही (लागू असेल त्यावर √ खूण करावी)

असल्यास बचत गटाचे नाव व पत्ता ----------------------------------------------

बचत गट ज्या क्षेत्रात काम करीत आहे त्याचा उल्लेख करावा. -----------------------

१२) अर्जदार सुशिक्षित बेरोजगार आहे का? : होय/नाही (लागू असेल त्यावर √ खूण करावी)

असल्यास सेवायोजन कार्यालयाच्या नोंदणीपत्राची प्रत जोडावी.

१३) या योजनेअंतर्गत माझे प्रकरण मंजूर झाल्यास त्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिश्श्याची रक्क म मी स्वत: उभी करण्याची हमी देत आहे/बँकेकडू न कर्ज मंजूर करून घेण्याची जबाबदारी माझेवर राहील. माझ्या हिश्याची रक्कम मी उभारल्याशिवाय मला योजनेचा लाभ मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.

१४) कर्जासाठी बँकेचे नाव व शाखा ----------------------------------

प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती पूर्णपणे सत्य आहे. या माहितीमध्ये कोणतीही असत्यता आढळल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर राहील व त्यामुळे मी उक्त योजनेचा लाभ मिमळण्यास अपात्र ठरेन अथवा मला योजनेखाली मंजूर करण्यात आलेल्या लाभाची वसूली माझेकडून करण्यात येईल याची मला जाणीव आहे व त्यास माझी पूर्ण संमती आहे.

अर्जदाराची सही/अंगठा

अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

१. फोटो ओळखपत्राची सत्यप्रत
२. दारिद्रय रेषेखाली असल्याचा दाखला
३. ७/१२ व ८-अ उतारा आणि ग्रामपंचायत नमुना नं. ८
४. प्रशिक्षण घेतले असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत
५. जातीच्या दाखल्याची सत्यप्रत
६. बचत गट सदस्य असल्यास प्रमाणपत्र
७. रोजगार-स्वयंरोजगार कार्यालयाचे नाव नोंदणी कार्डची सत्यप्रत
८. अपत्य दाखला (ग्रामपंचायत दाखला)

प्रमाणपत्र:

प्रमाणित करण्यात येते की, अर्जदार श्री. श्रीमती/कु. --------------------------------- यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या माहिती पैकी प्रत्यक्ष पडताळणी करावयाच्या बाबींची संबंधितांचे घरी जाउन प्रत्यक्ष पडताळणी केली आहे . त्या नुसार नमूद तपशील बरोबर आहे.

स्वाक्षरी/-

डॉ/ श्री .
सहा. आयुक्त पशुसंवर्धन, तालपसचि-------------/
पविअ, पवैद श्रेणी-१ -----------------------------/
सहा.पविअ/प.प., पवैद श्रेणी-२-------------------/

## पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०७

---

संदर्भः- १. महाराष्ट्र शासन नियोजन विभाग परिपत्रक क्रमांक- जिवायो-१००९/प्र. क्र.-१९३/का-१४८१ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक ३० डिसेंबर २००९.

**लाभार्थीची निवड**

१. याजनेत लाभार्थी निवड करण्याकरीता पारदर्शक पध्दती असावी.

२. अंमलबजावणी यंत्रणांनी वैयक्तिक लाभार्थीची निवड करताना प्रसिध्दी देउन अर्ज मागवावेत व विहित वेळेत प्राप्त झालेल्या अर्जांची छानननी करुन पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.

३. लाभार्थींचे निनवड करण्याचे अधिकार ज्या समितीस दिले आहेत, त्या समितीमधील सदस्य विविध प्रशासकीय विवभागातील असावेत व त्यापैकी किमान ५० टक्के सदस्य हे प्रशासकीय विभागाबाहेरील असावेत. यापैकी एक सभासद राज्यशासनातील वित्तीय पदांवर काम करणारा असावा.

४. निधी वितरणापूर्वी अंमलबजावणी यंत्रणेमार्फत निवडण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी उपलब्ध करण्यात आलेली असावी. जेथे निधी वितरणापूर्वी लाभार्थ्यांची यादी उपलब्ध करण्यात आलेली असावी. जेथे निधी वितरणापूर्वी लाभार्थ्यांची यादी मिळवणे शक्य नसेल, अशा वेळी कार्यान्वयीन यंत्रणांनी मागील वेळी वितरीत केलेल्या निधीतून निवडलेल्या लाभार्थ्यांची यादी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावी. लाभार्थ्यांची निवड योग्यरित्या करण्यात आलेली आहे याची जिल्हाधिकाऱ्यांना खात्री करुन द्यावी व त्यानुसार निधीचे वितरण करावे.

५. कार्यान्वयीन यंत्रणांनी योजनेमध्ये निवडलेल्या लाभार्थ्यांची यादी माहिती फलकावर व विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी तसेच सदरची यादी mpsims या प्रणालीवरही नोंदविण्यात यावी.

६. विभागीय आयुक्तालयातील उपायुक्त (नियोजन) / जिल्हा नियोजन अधिकारी तसेच इतर अधिकारी जेव्हा क्षेत्रीय भेटी देतात तेव्हा त्यांनी यादीतील लाभार्थ्यांची माहिती तपासावी.

७. लाभार्थी निवडताना एकूण लाभार्थ्यांच्या ३० टक्के महिला लाभार्थी निवडीस प्राधान्य देण्यात यावे.

८. लाभार्थी निवडताना ३ टक्के लाभार्थी विकलांग प्रवर्गातील असावेत.

९. लाभार्थी निवडताना संबंधित ग्रामपंचायतीची शिफारस प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

**योजनेचे स्वरुप**

१. प्रशिक्षण वर्ग कालावधी ३ दिवसाचा राहील.

२. रुपये १०००/- प्रती लाभार्थी खर्चाच्या मर्यादेत सन २०१४-१५ च्या उपलब्ध निधीतून प्रशिक्षणार्थींची संख्या ठरविण्यात यावी.

३. प्रशिक्षण जनावरांच्या प्रक्षेत्रावरच घेण्यात यावे. यासाठी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, शेळी मेंढी विकास महामंडळ, भारतीय कृषी औद्योगिक प्रतिष्ठान, कृषि व पशुवैद्यकीय महाविद्यालय यांची मदत घ्यावी.

४. प्रक्षेत्रावर प्रशिक्षण घेणे शक्य नसल्यास इतर ठिकाणी सोयीनुसार प्रशिक्षण घेण्यात यावे.

५. लाभार्थ्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था प्रक्षेत्रावर / नियोजित ठिकाणी करावी.

६. लाभार्थ्यांना सकाळच्या सत्रात प्रत्यक्ष तांत्रिक कामाबाबत प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिक देण्यात यावे व प्रशिक्षणार्थी समजूनच त्यांचेकडून काम करुन घ्यावे. संपूर्ण काम त्यांचेवर सोपवू नये, दुपारच्या सत्रात, प्रक्षेत्रावरील गाई - म्हशीचे व्यवस्थापन यामध्ये मुख्यत: संकरित पैदाशिचे, तंत्रज्ञान, ॠतुचक्र, माज ओळखणे, कृत्रिम रेतन, गाभण गाई, म्हशींची निगा जन्मलेल्या वासरांचे संगोपन, खाद्य - वैरणीचे प्रकार व उत्पादन तंत्रज्ञान, दुग्ध स्पर्धा स्वच्छ दुग्ध उत्पादन, जनावरांना होणारे रोग व त्यानुसार रोगप्रतिबंधक लसीकरण, औषोधोपचार, सहकारी संस्थेचे सभासदत्व इ. बाबतची माहिती द्यावी.

७. शेळयामध्ये संकरित पैदास, जन्मलेल्या करडाची जोपासना, नरविक्रीबाबत बाजार व्यवस्था व शेळी पालन प्रकल्प अर्थशास्त्र याबाबतची माहिती द्यावी.

८. सकाळी ५ ते ८ आणि संध्याकाळी ४ नंतर प्रात्यक्षिके आयोजित करुन लाभार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागी करुन घ्यावे.

९. उर्वरित वेळेत दृकश्राव्य माध्यम, मॉडेल्स, चार्ट द्वारे प्रशिक्षण वर्गामध्ये तांत्रिक मार्गदर्शन करावे.

१०. प्रगतीशील शेतकऱ्यांकडे सहल / बचत गटांना भेटी देऊन, त्यानुसार त्यांच्याकडील जनावरांच्या जोपासनेबाबत प्रात्यक्षिक दाखवावे. जवळच असलेली प्रक्षेत्रे दुधमहासंघ, शेळया मेंढयांचे प्रक्षेत्रे यांना भेटी देण्यात याव्यात.

११. ट्रेनिंग एड मटेरियल अंतर्गत प्रसिध्दी फलक तयार करुन घ्यावेत. प्रसिध्दीसाठी पत्रके / बॅनर्स, दृकश्राव्य व्यवस्था, तांत्रिक कॅसेट्स प्रशिक्षणाच्या संदर्भात उपलब्ध करुन घेऊन लाभार्थींना मार्गदर्शन करावे.

१२. एका लाभार्थीवरील रु. १,०००/- मर्यादेपर्यंतचा खर्च खालीलप्रमाणे दाखविलेल्या तपशीलानुसार असावा.

| **अ.क्र.** | **बाब** | **अंदाजे मर्यादा रक्कम** |
|---|---|---|
| १. | लाभार्थींना चहा, नाष्टा जेवण | ३००<br>(रु.१००/- प्रतिदिवस) |
| २. | जाण्या येण्याचा खर्च (एसटी/रेल्वे तिकीट पाहून) | १००/- |
| ३. | पेन, नोंदवही, छापील तांत्रिक माहीती | १००/- |
| ४. | दृकश्राव्य व्यवस्था प्रचार, बॅनर्स, चार्टस (ट्रेनिंग एड मटेरियल अंतर्गत) प्रशिक्षणार्थी बैठक व्यवस्था हॉल इ. अनुषंगिग खर्च. | ५००/- |
| | **एकूण** | १०००/- |

**योजनेचे अंमलबजावणी अधिकारी**

१. योजनेची अंमलबजावणी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद हे असतील.

२. पात्र लाभार्थीकडून विहित नमुन्यामध्ये अर्ज घेऊ न पशुधन विक ास अधिकारी (विस्तार) यांनी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदरचे अर्ज शिफारशीसह जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे पाठवून त्यांची तांत्रिक मंजुरी घ्यावी.

३. सन २०१४-१५ मध्ये वितरीत निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र पुढील वर्षाच्या एप्रिल महिन्यात प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचेमार्फत सादर करणे बंधनकारक राहील.

**योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापन**

१. योजनेचे संनियंत्रण जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयामार्फत करणेत येईल. योजनेचे मुल्यमापन, अंमलबजावणी, परिणामकारकताअर्थिक, भौतिक साध्य, इत्यादी बाबतचा अहवाल पुढील वर्षाच्या एप्रिल महिन्यातआयुक्त कार्यालयास प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी सादर करावा.

२. वरील अहवालावर अतिरिक्तआयुक्त पशुसंवर्धन (रोग नियंत्रण व पशुधन विकास) यांचे अभिप्राय घेऊ न वार्षिक प्रशासन अहवालामध्ये समावेश करु न घेण्याची जबाबदारी सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) यांची राहील.

**आयुक्त पशुसंवर्धन**

**महाराष्ट्र राज्य, पुणे ०७**

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

(२ ते ८) मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, विभाग सर्व.

(९ ते ३८) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सर्व.

(३९ ते ७२)   जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.

(७३)   कार्यासन अधिकारी पंस ६ यांना माहितीसाठी.

**पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र  राज्य, पुणे ०७**

---

संदर्भः- १. महाराष्ट्र  शासन नियोजन विभाग परिपत्रक क्रमांक जिवायो १००९/प्र.क्र.-१९३/का-१४८१ मंत्रालय,मुंबई - ३२, दिनांक ०३/१२/२००९.

२. महाराष्ट्र  शासन नियोजन विभाग परिपत्रक क्रमांक जिवायो १००९/प्र.क्र.-१९३/का-२१३ मंत्रालय,मुंबई - ३२, दिनांक ३०/१२/२००९.

**मार्गदर्शक सुचना २०१४-१५**

**योजनेचा उद्देश**

**गायी म्हशी मधील वंध्यत्वाची कारणमिमांसा पडताळणी करणे व वैज्ञानिक पद्धतीने वंध्यत्वाचे निवारण करणे**

१. राज्यात गायी व म्हशी मध्ये कृत्रिम रेतनाची यशस्वीतेचे प्रमाण एकास तीन (३३ टक्क्यांचे दरम्यान) आहे. परंतु कृत्रिम रेतनासंबंधीचे अभिलेखे उदा. कृत्रिम रेतनांची नोंदवही, संकरीत वासरांची जन्म बारनिशी, वंध्यत्व तपासणी  नोंदवही, इत्यादी अद्ययावत न ठेवल्यामुळे तसेच कृत्रिम रेतनाच्या उद्दिष्ट पूर्ततेकरीता, दुबार व तिबार किंवा त्यानंतरच्या कृत्रिम रेतनांची नोंद नवीन प्रकरण म्हणून केल्या मुळे वंध्यत्वाचे निश्चित आकडेवारी उपलब्ध नसली तरी पण क्षेत्रिय पाहणीवरुन सुमारे पंधरा वीस टक्के पैदास क्षम गायी व म्हशी मध्ये वंध्यत्वाचा प्रभाव दिसून येतो. तसेच संकरीत गायीमध्ये याप्रकारच्या वंध्यत्वाचे प्रमाण देशी गायीपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.  या कारणामुळे कृत्रिम रेतनाचे पध्दतीबाबत गैरसमज निर्माण होत आहेत.  या वंध्यत्वापैकी तात्पुरते वंध्यत्वाचे प्रमाण मुख्यत्वे करुन जास्त असल्याचे क्षेत्रिय अधिकाऱ्यांचे मत आहे.

२. जास्त दुध देणाऱ्या गायी व म्हशी मध्ये संतुलित आहार देऊनही वंध्यत्वाचा प्रश्न निर्माण होणे ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने आर्थिक नुकसानीची व चिंतेची बाब असून अशा प्रकारची कारणमिमांसा शोधणे व शास्त्रोक्त पध्दतीने हाताळणी करुन वंध्यत्व दूर करणे असा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

३. तसेच कमी दुध देणाऱ्या गायी व म्हशीमध्ये कुपोषणामुळे व असंतुलित आहारामुळे होणारे वंध्यत्व दुर करण्याकरिता शेतकऱ्यांमध्ये याबाबत प्रबोधन करणे आवश्यक आहे.

**लाभार्थ्यांची पात्रता व निवड**

१. सदर योजनेमध्ये आदिवासी उपाययोजना (TSP) / आदिवासी क्षेत्राबाहेरील आदीवासी उपयोजना (OTSP) अंतर्गत अनुसुचित जमातीचे लाभार्थी लाभ घेण्यासाठी पात्र असतील.
२. वंध्यत्व नोंदवहीत नोंद झालेल्या वंध्यत्वग्रस्त पैदास क्षम गायी व म्हशी या योजनेअंतर्गत लाभ मिळण्यास पात्र राहतील.

**योजनेचे स्वरुप**

१. वंध्यत्वाची आकडेवारी निश्चित करणे व दरवर्षी अद्ययावत करणे. - या योजनेअंतर्गत जिल्हा परिषद स्तर व राज्यस्तरीय सर्व श्रेणी १ व २ चे पशुवैद्यकीय दवाखाने, तालुका लघुपशुसर्वचिकीत्सालये व जिल्हा पशुसर्वचिकीत्सालय येथे वंध्यत्व नोंद वही ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी. सदर नोंदवहीत नोंद झालेल्या वंध्यत्वग्रस्त पैदासक्षम गायी व म्हशी या योजनेअंतर्गत लाभ मिळण्यास पात्र राहतील.

३. सदरची नोंदवही दरवर्षी एप्रिल महिन्याच्या सुरवातीला अद्ययावत करण्याची जबाबदारी त्या त्या संस्था प्रमुखावर राहील. तसेच सदर नोंदवही अद्ययावत ठेवण्यात आल्याची तपासणी करण्याची जबाबदारी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त / जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांची राहील.

४. वंध्यत्वग्रस्त जनावरांची ओळख - वंध्यत्वग्रस्त जनावरे ओळखणेकरीता गायींना / म्हशींना योग्य पध्दतीने बिल्ले लावणे आवश्यक राहील.

५. वंध्यत्वाची कारणमीमांसा - वंध्यत्वाच्या कारणमीमांसासाठी येणारा खर्च या योजनेतील उपलब्ध तरतुदीतुन करण्यात यावा. यात जननेंद्रीये तपासणी, रक्त तपासणी, सेक्सुअली ट्रान्समीटेड डिसीजेसची तपासणी, हार्मोन्स एस्टीमेशन व तज्ञ समितीने सुचवलेली इतर तपासणी इत्यादीबाबतचा खर्चाचा समावेश राहील.

६. वंध्यत्व उपचार व त्याकरीता येणारा खर्च - वंध्यत्व तपासणीकरीता व उपचाराकरीता येणारे बाबीखालील व अनुषंगीक बाबींच्या खर्चाचा समावेश राहील. उदा. शिथ, हार्मोन ट्रीटमेंट फॉर ओव्यूलेशन, प्रतिजैविके, जिवनसत्वे - ए, ई व ड साठी येणारा खर्च तसेच इनट्रायूटेराइन वापरावयाची औषधे उदा. ल्युगॉल्स आयोडीन, वॉटर फॉर इंन्जेक्शन, नॉर्मल सलाईन, इनज मेट्रोनिडेझोल, पोव्हीडॉन आयोडीन किंवा इतर तत्सम औषधे या अनुषंगिक बाबींसाठी येणाऱ्या खर्चाचा समावेश तज्ञ समितीच्या मान्यतेने करण्यात यावा.

७. सर्व साधारणपणे वंध्यत्व निवारण्याकरीता संस्था स्तरावर येणारा खर्च - प्रति वाज जनावर रु. १०००/- पेक्षा जास्त नसावा.

८. वंध्यत्वाबाबत व उपचाराबाबत अभिलेखे ठेवणे - अशा गायी व म्हशी मालकांना एक मार्गदर्शक पुस्तिका देण्यात येईल. यामध्ये वंध्यत्वग्रस्त गायी व म्हशींची योग्य पध्दतीने निगा राखण्याबाबत मार्गदर्शक सुचनांचा समावेश राहील. या पुस्तिकेमध्ये अशा गायी व

म्हशींच्या वंध्यत्वाबाबत कारणमीमांसा व औषधोपचारांच्या नोंदी घेण्याची व्यवस्था राहील. व तशा नोंदी घेणे आवश्यक राहील. या व्यतिरीक्त पशुवैद्यकीय दवाखानेचे स्तरावर योजनेचे अद्ययावत अभिलेखे ठेवणे बंधनकारक राहील.

९. तज्ञ समिती - सदरच्या तज्ञ समितीमध्ये अतिरीक्त आयुक्त पशुसंवर्धन ( पशुधन विकास व रोगनियंत्रण) म. रा. पुणे व महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ यांचे प्रतिनिधी व संबंधित कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे प्रतिनिधी तसेच संबंधित विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, संबंधित जिल्हयाचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त व संबंधित जिल्हयाचे पशुसर्वचिकित्सालयाचे या विषयांतील तज्ञ इत्यादीचा समावेश राहील. सदरची समिती जिल्हा निहाय अशा प्रकरणांचा आढावा घेऊन वंध्यत्वाची कारणमीमांसा, त्याची उपचार पध्दतीबाबत सूचना करेल व आवश्यकते प्रमाणे संबंधित दवाखान्याचे पशुवैद्यकीय अधिकारी यांनी चालू केलेल्या उपचार पध्दतीत आवश्यकतेनुसार सुधारणा सुचवतील.

## योजनेचे अंमलबजावणी अधिकारी

१. योजनेचे अंमलबजावणी अधिक ारी - सदर योजनेची अंमलबजावणी संबंधित जिल्हयाचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे सहनिरीक्षणाखाली जिल्हा पशुवैद्यकीय सव ´ चिचकिकत्साल्याचे या विषयातील तज्ञ याचे मार्फत होईल.

२. रोगनिदानाबाबतची तपासणी हार्मोन एस्टीमेशन, हार्मोन उपचार, रक्त तपासणी इत्यादी उच्चतंत्रज्ञानाचा वापर करु न दिल्या जाणाऱ्या उपचारासंबंधीचा निधी या करीता लागणारे साहित्य इत्यादी बाबत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे स्तरावरु न कार्यवाही होईल. त्याव्यतिरीक्त ज्या वस्तूंचा पुरवठा स्थानिक दवाखान्याकडून करणे सहजशक्यआहे, अशा वस्तू, औषधी त्या दवाखन्यामार्फ त या योजनेअंतर्गत उपलब्ध करु न देणे अपेक्षित राहील.

## योजनेचे संनियंत्रण व देखरेख व मुल्यमापन

योजनेचे संनियंत्रण व देखरेख - सदर योजनेचे राज्यस्तरीय संनिनयंत्रण व देखभालीची जबाबदारी अतिरीक्त आयुक्त पशुसंवर्धन (पशुधन विकास रोग नियंत्रण) यांची राहील. विभागीय स्तरांवर संनियंत्रण व देखरेखीची जबाबदारी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांची राहील योजनेचे संनियंत्रणव मुल्यमापन, अभिलेखे ठेवणे इ. साठी या योजनेसाठी त्या-त्या वर्षातील प्राप्त तरतुदीच्या पाच टक्के पर्यंतच्या रक्कमेतून करता येईल. या योजनेचे विभागनिहाय वार्षिक मुल्यमापन अहवाल प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी तयार करु न अतिरीक्त आयुक्त पशुसंवर्धन (पशुधन विकास व रोग नियंत्रण) यांचेकडे सादर करावयाचा आहे. त्यानंतर अतिरीक्त आयुक्त पशुसंवर्धन (पशुधन विकास व रोग नियंत्रण) यांनी या मुल्यमापन अहवालाची छाननी करु न आवश्यक ती सुधारणा करु न खात्याचे वार्षिक प्रशिक्षण अहवालात समावेश करण्याकरीता सहआयुक्त (मुख्यालय) यांचेकडे देणे अपेक्षित आहे.

**आयुक्त पशुसंवर्धन**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-०७**

**प्रतः- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

(२ ते ८) मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, विभाग सर्व.

(९ ते ३८) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सर्व.

(३९ ते ७२) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.

(७३) कार्यासन अधिकारी पंस ६ यांना माहितीसाठी..

## पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०७

---

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन क्रमांक- जिवायो २०१०/प्र.क्र.-३४०/पदुम- ४ मंत्रालय, विस्तार मुंबई - ३२, दिनांक ३०/०८/२०१०.

१. सदर कार्यक्र माअंतर्गत पशुखाद्याच्या स्वस्पात अल्प भूधारक, अत्यल्प भूधारकास व भूमीहीन शेतमजूरांच्या व पशुपालकांच्या संकरीत /देशी कालवडी/सुधारीत/देशी पारडयांना ५० टक्केअनुदानावर पशुखाद्य देण्यास्तव निनवड करण्यात यावी.
२. लाभार्थी निनवड प्रक्रिया पारदर्शक असावी.
३. अंमलबजावणी यंत्रणांनी वैयक्तिक लाभार्थीची निवडकरताना व्यापक प्रसिध्दी देउनअर्ज मागविण्यात यावे व विहीत वेळेत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन सर्वात अधिक पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.
४. लाभार्थी निवडताना एकूण लाभार्थ्याच्या ३० टक्के महिला लाभार्थी निवडण्याबाबत प्राधान्य देण्यात.
५. लाभार्थी निवडताना ३ टक्के लाभार्थी विकलांग प्रवर्गातील असावेत.
६. लाभार्थीची निवड करताना संबंधित ग्रामपंचायतीची शिफारस घेणे बंधनकारक राहील.

**योजनेचे स्वरुप**

१. पशुपालकाकडील संकरीत / देशी कालवडी व सुधारित / देशी मशिच्या पारडया शास्त्रोक्त पध्दतीने जोपासण्यासाठी सकस खाद्य देऊन तसेच पशुपालकांना प्रशिक्षित करुन अधिक उत्पादन देणाऱ्या संकरित गायी व सुधारित म्हशींची निर्मिती करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. सदर कार्यक्रमाअंतर्गत पशुखाद्याच्या स्वरुपात अल्पभुधारक, अत्यल्प भूधारकास व भूमिहीन शेतमजुरास ५० टक्के अनुदानावर पशुखाद्य देणे व पशुपालकांचे संकरित / देशी कालवडी / सुधारित / देशी पारडयांचा विमा याबाबींचा अंतर्भाव करण्यात यावा.
२. लाभार्थी कडील संकरित / देशी कालवडीचा तिच्या वयाच्या ४ महिन्यापासून ३२ महिन्यापर्यंत व सुधारित / देशी पारडीला तिच्या वयाच्या ४ महिन्यापासून ४० महिन्यापर्यंत पशुखाद्याच्या स्वरुपात ५० टक्के अनुदानावर पशुखाद्य पुरविण्यात यावे. कालवडीस / पारडीस ज्या वयापासून खाद्य देणे सुरु होईल त्या तारखेपासून दर ३ महिन्याने खाद्य पुरवठा करणेत यावा.
३. संकरित / देशी कालवडी / म्हशींच्या पारडयाचे खाद्य प्रकरणी परिशिष्ट - २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे खाद्य पुरवठा करणे आवश्यक असेल. त्यामध्ये एकूण खाद्याच्या

किंमतीच्या ५० टक्के अनुदान असेल व ५० टक्केची रक्कम लाभार्थी कडून वसुल करावी व खाद्यपुरवठा करावा.

४. भारतीय मालक संस्थेच्या प्रमाणकानुसार खाद्यामध्ये मॉइश्चरचे प्रमाण १० टक्के, क्रुड प्रोटीनचे प्रमाण २० टक्के , क्रुड फायबरचे प्रमाण १३ टक्के, क्रुड फॅटचे प्रमाण २.५ टक्के, ॲसिड इन्सोल्युबल ॲश ४ टक्के. सॉल्टचे प्रमाण २ टक्के, कॅल्शियमचे प्रमाण ०.५ टक्के, फॉस्फरसचे प्रमाण ०.५ टक्के प्रमाणे असणे आवश्यक आहे.

५. क्षार मिश्रण, अ जिवनसत्व, कृमि नाशके इ. चा पुरवठा तसेच लाळखुरकुत लसीकरण करण्यासाठी इतर योजनेअंतर्गत उपलब्ध पुरवठयातून सदरील कालवड / पारडीस प्राधान्य देण्यात यावे.

६. सदरील योजनेअंतर्गत कालवडीचा / पारडीचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. लाभार्थीकडून विमा हप्त्याची रक्कम वसूल करुन नंतरच विमा अनुदानाची रक्कम अदा करण्यात यावी. विमा हप्त्याच्या ५० टक्के रक्कम शासन अनुदान राहील. या अनुदानाची कमाल मर्यादा रु. ३००/- एवढी राहील. विम्याचा कालावधी सलग ३ वर्षाचा असावा.

७. एका कुटुंबातील एका कालवड/पारडीसाठी योजनेत लाभ देण्यात यावा. पशुखाद्य व विम्यासाठी एका कालवडीकरीता अनुदानाची मर्यादा रु. १०,०००/- व एका पारडीसाठी अनुदान मर्यादा रु.१२,५००/- राहील.

८. अनुसूचित जाती, जमाती (मागासवर्गीय, अल्प व अत्यल्प भूधारक) यांना प्राधान्य देण्यात यावे.

९. खात्याच्या दरकरारानुसार पशुखाद्य खरेदी करुन पुरवठा करण्यात यावा. ज्यावेळी दरकरार उपलब्ध नसेल अशा वेळी विहीत शासकीय कार्य प्रणालीचाअवलंब करुन पशुखाद्याची खरेदी करण्यात यावी.

१०. प्रस्तुत योजना राबविण्यासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त करुन घेणे योजनांतर्गत प्रस्ताव मंजूर करणे व प्रत्यक्ष निधी वितरणाकरीता खालील कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी.

  १. या योजनेंतर्गत लाभ मिळवणेसाठी विशिष्ट कालावधी निर्धारीत करावा.
  २. पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती विस्तार यांचे स्तरावर शेतकरी/पशुपालकाकडून अर्ज मागविण्यात यावेत.
  ३. पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती (विस्तार) यांनी प्राप्त झालेल्या अर्जाची दिनांकनिहाय नोंद ठेवावी व प्राप्त झालेले सर्व अर्ज शिफारशीसह जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठीरवाईसाठी पाठविण्यात यावेत.
  ४. योजनेचे अर्ज तालुका पशुसंर्धन कार्यालयात, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयात, जिल्हाधिकारी कार्यालय व वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात यावेत..

**लाभार्थी निवड समिती -**

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त .......................................अध्यक्ष
जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी ...........................सदस्य
कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद .............................सदस्य
जिल्हा समाजकल्याण अधिकारी ....................................सदस्य
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद ......................सदस्य सचिव

११. शासन नियोजन विभाग शासन निर्णय क्र .जिवायो/प्र.क्र .३९/का-१४४४, दिनांक १६/२/२००८ नुसार प्रशासकीय मंजूरी जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी.

१२. सदर योजनेचे कार्यान्वयीन अधिकारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद हे राहतील. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त हे विभागीय सनियंत्रण अधिकारी राहतील तर संपूर्ण राज्याकरीता अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

१३. या योजने अंतर्गत ३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीखाली जिल्हा नियोजन समिमतीकडे निधी प्रस्तावित करावा.

१४. या योजनेचा वार्षिक फलश्रुती अहवाल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचे मार्फत आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करावा.

**आयुक्त पशुसंवर्धन**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-०७**

**प्रतः- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

(२ ते ८) मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, विभाग सर्व.

(९ ते ३८) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सर्व.

(३९ ते ७२) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सर्व.

(७३) कार्यासन अधिकारी पसं ६ यांना माहितीसाठी..

**परिशिष्ठ**

संकरीत कालवडी /म्हशीच्या पारड्याचे खाद्य प्रकरणी खालील प्रमाणे खाद्य पुरवठा करावा लागेल.

| | | |
|---|---|---|
| ४ था महिना | १ किलो प्रतिदिन प्रमाणे महिन्यासाठी | ३० किलो |
| ५ वा महिना | दिड किलो प्रतिदिन प्रमाणे महिन्यासाठी | ४५ किलो |
| ६ वा महिना | पावणे दोन किलो प्रतिदिन प्रमाणे महिन्यासाठी | ५२.५ किलो |
| ७ वा महिना ते १८ महिने पर्यंत | दोन किलो प्रतिदिन प्रमाणे १२ महिन्यासाठी | ७२० किलो |
| १९ वा महिना ते ३२ महिने पर्यंत कालवडीसाठी | अडिच किलो प्रतिदिन प्रमाणे १४ महिन्यासाठी | १०५० किलो |
| | एकूण खाद्य | १८९७.५० किलो |
| | म्हणजेच | १९०० किलो |
| ३३ वा महिना ते ४० महिने पर्यंत<br>म्हशीच्या पारडीसाठी | अडिच किलो प्रतिदिन प्रमाणे ८ महिन्यासाठी | ६०० किलो |
| पारडीसाठी | एकूण खाद्य १९०० अ ६०० | २५०० किलो |

१५. **परिशिष्ट १**

## प्रशिक्षणाचा प्रस्तावित अभ्यासक्रम

१. राष्ट्रीय संपत्तीत पशुधनाचे महत्त्व

२. गाभण गायी/म्हशीची काळजी घेण्याने वासरांच्या जन्मावर होणारा परिणाम आणि इतर माहिती.

३. गाय/म्हैस विते वेळेस घ्यावयाची काळजी.

४. नवजात वासरांचे/पारडीचे संगोपन, चिकाचे महत्त्व आणि चिक देण्याचे प्रमाण, नाळ कापणे व नाळ कापताना घ्यावयाची काळजी शिंग कळया खुडणे, वासरांना/पारडीला गायीचे/म्हशीचे दुध वरून पाजण्याचे महत्त्व आणि पध्दती.

५. वासरांना/पारडीला संतुलित आहार किती व कसा द्यावा याची माहिती आणि महत्त्व.

६. वासरातील/पारडीतील कृमी, दुष्परिणाम, ओळख व कृमीनाशक औषध पाजण्याचा तक्ता.

७. गोठ्याची स्वच्छता, गोचीड, माश निर्मुलन महत्त्व आणि पध्दत.

८. धारा काढण्याची योग्य पध्दती, दुधाची साठवण व वितरण.

९. जनावरांचे सर्वसाधारण आजार व प्रतिबंध तसेच प्रथमोपचार

१०. जनावरातील साथीचे रोग, ओळख व प्रतिबंधक उपाय, लसीकरण तक्ता

११. गायी/म्हशींचे ऋतुचक्र व माज ओळखणे व गाय/म्हैस भरवण्याची योग्य वेळ

१२. वैरणींचे उत्पादन, हिरवी वैरण, वाळलेली वैरण, विविध चारा पिके.

१३. निकृष्ट वैरणीचे सकसीकरण करणे

१४. जनावराच्या मालकाने ठेवावयाच्या विविध नोंदी

१५. प्रश्नोत्तरे व शंका समाधान, उपसंहार, प्रशस्तीपत्र वितरण.

## पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र  राज्य, पुणे ०७

---

**संदर्भः-** महाराष्ट्र  शासन क्र मांक- जिवायो २०१२/प्र.क्र .-३०१/पदुम- ४ मंत्रालय, मुंबई - ३२, दिनांक ३१ जानेवारी २०१३.

**<u>मार्गदर्शक सूचना २०१४-१५</u>**

१. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना पशुपालनाविषयी माहिती व्हावी यासाठी सध्या प्रचलित असलेल्या आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, माहिती तंत्रज्ञान इत्यादी माध्यमांचा प्रभावीपणे वापर करण्यात यावा.

२. शासकीय दुरदर्शन केंद्रे, राज्यातील आक ाशवाणी केंद्रे तसेच खाजगी रेडिओ / दूरचित्रवाहिन्या, केबल टि. व्ही., वर्तमानपत्रे, छापील माध्यमे, माहिती तंत्रज्ञान (आय. सी. टी.) इत्यादींच्या माध्यमातून पशुसंवर्धन विभागाच्या महत्वाच्या निवडक बाबींना आणि योजनांना ठळकपणे प्रसिध्दी देण्यात यावी.

३. पशुसंवर्धन क्षेत्राशी निगडीत घडणाऱ्या उल्लेखनीय घटना, लागणारे विविध शास्त्रीय शोध, पशुवैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व शेतकऱ्यांच्या दृष्टीने पशुधन विषयक इतर उपयुक्त माहितीचा प्रसार होण्याकरता प्रशिक्षण देणे, कृषि विभागाच्या शेतीशाळांप्रमाणे पशुशेतीशाळांचे आयोजन करणे, पशुपालक यांची सहल आयोजित करणे, प्रात्यक्षिकाद्वारे पशुधनविषयक तंत्रज्ञानाचा प्रचार करणे, दुग्ध स्पर्धांचे आयोजन करणे इ. उपक्रमाद्वारे माहिती व प्रसिध्दी देण्यात यावी.

४. दृक श्राव्य माध्यमे, छापील साहित्य, माहिती फलक इत्यादी माध्यमांद्वारे प्रसिध्दी देणे, त्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करणे किंवा भाडयाने घेणे, स्टॉल लावणे, कलापथक किंवा पथनाटयाद्वारे पशुसंवर्धन विषयाबाबत जनजागृती करणे, जाहीर प्रसिध्दी कार्यक्रम आयोजित करणे व त्याकरीता अनुषंगिक बाबीवरील खर्च (उदा. मंडप व व्यासपिठ उभारणी, ध्वनी व्यवस्था, बैठक व्यवस्था, कार्यक्रम प्रसिध्दी इ.) विहीत शासकीय कार्यप्रणालीचा अवलंब करुन भागविण्यात यावा.

५. या योजने अंतर्गत पशुसंवर्धन विभागाच्या महत्वाच्या योजना, कार्यक्र म, घटना इत्यादी बार्बीना राज्यभर प्रसिध्दी देण्यात यावी. त्याचप्रमाणे योजनेसाठी खाजगी रेडिओ / दूरचित्रवाहिन्या / केबल टी. व्ही. वर प्रसिध्दी देणे अथवा क ार्यक्र म घेणे आवश्यक असल्यास शासकीय वाहिनीच्या दरांचे मर्यादेस अधिन राहून / शासनमान्य दरानुसार खाजगी वाहिन्यांवर पशुसंवर्धन विषयक बाबींसाठी प्रसिध्दी अथवा क ार्यक्र म आयोजित करण्यात यावेत.

६. या योजनेअंतर्गत उपघटकांची अंमलबजावणी करावयाची असल्यास तसे प्रस्ताव प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी आयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे सादर करावे. आयुक्त पशुसंवर्धन यांनी सदर प्रस्तावास मंजुरी दिल्यानंतर त्यासाठी आवश्यक तेवढी तरतुद संबंधित कार्यालयास वर्ग करण्यात येईल.

७. खर्च करताना विहित शासकीय कार्यप्रणालीचा अवलंब करुनच खर्च करण्यात यावा.

८. योजनेच्या अंमलबजावणीबाबतचा सविस्तर अहवाल खात्यास सादर करावा तसेच उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

**आयुक्त पशुसंवर्धन**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-०७**

**प्रतः- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

(२ ते ८) मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, विभाग सर्व.

(९) कार्यासन अधिकारी पसं ६ यांना माहितीसाठी..

## पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र  राज्य, पुणे ०७

-----------------------------------------------------------------------------------

**संदर्भः-** १. महाराष्ट्र  शासन क्रमांक- जिवायो १००९ /प्र.क्र.-१९३ /का - १४८१
मंत्रालय,  मुंबई - ३२, दिनांक ०३ / १२ / २००९.
२.महाराष्ट्र  शासन क्रमांक- जिवायो १००९ /प्र.क्र.-१९३ /का - २१३
मंत्रालय,  मुंबई - ३२, दिनांक ३० / १२ / २००९.

**लाभार्थीची पात्रता व निवड**

या योजने अंतर्गत अल्पभुधारक, अत्यल्पभूधारक व शेतमजुर यांची व्याख्या खालीलप्रमणे करण्यात आलेली आहे.

**अ :- अल्प भूधारक -** २.५ एकरापेक्षा जास्त परंतु ५ एकरापेक्षा कमी कोरडवाहू जमिन व बागायत जमिन असल्यास २.५ एकरपेक्षा जास्त व १.२५ एकरपेक्षा कमी नसावी.

**ब :- अत्यल्प भूधारक** - २.५ एकरापेक्षा जास्त कोरडवाहू  जमिन नसावी.  बागायत जमिन असल्यास १.२५ एकरपर्यंतच असावी.

**कः- शेतमजूर -** शेतजमीन नसलेला लाभधारक परंतु त्याचे ५० टक्के पेक्षा जास्त उत्पन्न शेताच्या मजूरीतून मिळालेले असावे.

१. सदर योजनेस प्रशासकीय मान्यता देतेवेळी या योजनेत लाभार्थी  निवड करण्याकरीता पारदर्शक पध्दती असणे आवश्यक आहे.

२. अंमलबजावणी यंत्रणांनी  वैयक्तिक यंत्रणांनी लाभार्थी ंची निवड करताना प्रसिध्दी देउनअर्ज मागविण्यात यावे व विहीत वेळेत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन सर्वात अधिक लाभार्थी ची निवड करण्यात यावी.

३. लाभार्थींचे  निवड करण्याचे अधिकार ज्या समितीस दिले आहे. त्या समितीमधील सदस्य विविध प्रशासकीय विभागातील असावेत व त्यापैकी किमान ५० टक्के सदस्य हे प्रशासकीय विभागाबाहेरील असावेत. यापैकी एक सभासद राज्यशासनातील वित्तीय पदांवर काम करणारा असावा.

४. निधी वितरणपूर्वी अंमलबजावणी अधिकारी यांनी निवडण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी सादर करावी व लाभार्थ्याची निवड योग्य प्रकारे करण्यात आलेली आहे  याची खात्री झाल्यावर जिल्हाधिकारी/जिल्हा नियोजन अधिकारी यांनी वितरीत करावा.

५. जेथे निधी वितरणापूर्वी लाभार्थ्यांची यादी मिळवणे शक्य नसेल, अशा योजनांसाठी निधी वितरीत करण्यापूर्वी अंमलबजावणी अधिकारी यांनी मागील वेळी वितरीत केलेल्या

निधीतून निवडलेल्या लाभार्थ्यांची यादी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावी. लाभार्थ्यांची निवड योग्यरीत्या करण्यात आलेली आहे याची जिल्हाधिकाऱ्यांना खात्री करुन द्यावी व त्यानुसार निधीचे विवतरण करावे.

६. लाभार्थी निवडताना एकूण लाभार्थ्यांच्या ३० टक्के महिला लाभार्थी निवडण्याबाबत प्राधान्य देण्यात यावे.

७. लाभार्थी निवडताना ३ टक्के लाभार्थी विकलांग प्रवर्गातील असावेत.

८. लाभार्थींची निवड करताना संबंधित ग्रामपंचायतीची शिफारस घेणे बंधनकारक राहील.

९. दारिद्र्य रेषेखालील पात्र लाभार्थीं चे अर्ज

अ. दारिद्र्य रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र (सत्यप्रत)

ब. जातीचे प्रमाणपत्र

क. पशुवैद्यकीय दवाखान्याचे पारडीच्या/कालवडीच्या जन्मतारखेचे प्रमाणपत्र.

ड. कालवड/पारडी विकत घेतली असेल तर ग्रामपंचायतीचा दाखला इ. सर्व बाबी तपासणे आवश्यक आहे.

**योजनेचे स्वरुप**

१. लाभार्थीकडील संकरीत कालवडीचा तिच्या वयाच्या पहिल्या महिन्यापासून ३२ महिन्यांपर्यंत/पारडीला तितच्या वयाच्या चौथ्या महिन्यापासून ते ४० महिन्यापर्यंत पशुखाद्याच्या स्वरुपात अल्प भूधारक व अत्यल्प भूधारकास ५० टक्के आणि भूमीहीन शेतमजूरांस ६६.६६ टक्के अनुदान देण्यात येईल. कालवडीस/पारडीस ज्या वयापासून खाद्य देणे सुरु होईल त्या प्रमाणात त्यांना तिमाही खाद्य मंजूर करावे.

२. संकरीत कालवडी / म्हशीच्या पारडयाचे खाद्य प्रकरणी खालीलप्रमाणे खाद्य पुरवठा करावा लागेल.

| | | |
|---|---|---|
| ४ था महिना | १ किलो प्रतिदिन प्रमाणे एक महिन्यासाठी | ३० किलो |
| ५ वा महिना | दिड किलो प्रतिदिन प्रमाणे एक महिन्यासाठी | ४५ किलो |
| ६ वा महिना | पावणे दोन किलो प्रतिदिन प्रमाणे एक महिन्यासाठी | ५२.५ किलो |
| ७ ते १८ महिनेपर्यंत | दोन किलो प्रतिदिन प्रमाणे १२ महिन्यांसाठी | ७२० किलो |
| १९ ते ३२ महिनेपर्यंत | अडिच किलो प्रतिदिन प्रमाणे १४ महिन्यांसाठी | १०५० किलो |
| **कालवडीसाठी** | एकूण खाद्य | १८९७.५० किलो |
| | म्हणजेच | **१९०० किलो** |
| ३३ ते ४० महिने पर्यंत म्हशीच्या पारडीसाठी | अडिच किलो प्रतिदिन प्रमाणे ८ महिन्यांसाठी | ६०० किलो |
| **पारडीसाठी** | एकूण खाद्य १९००+६०० | **२५०० किलो** |

हया प्रमाणे तिमाही खाद्य पुरविण्यात यावे. तथापि अनुदानाच्या कमाल मर्यादेपर्यंत खाद्य अनुदानवर द्यावे व उर्वरीत खाद्य लाभधारकांच्या संपूर्ण खर्चाने किंवा बँकेकडून कर्ज घेवून द्यावे लागेल. अशा प्रकारच्या सूचना लाभधारकांस सुरुवातीसच देण्यात याव्यात व मान्य असल्याचे लिहून घ्यावे.

३. लाभधारकाकडून त्यांच्या हिश्श्याची रक्कम स्वत:कडून अथवा बँकेकडून कर्ज घेवून आल्याशिवाय अनुदान मंजूर करु नये व कोणत्याही परिस्थितीत उधारीवर खाद्य मागू नये.

४. विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रमांतर्गत लाभार्थीना पशुखाद्य पुरवठा करणे साठी खात्याच्या दरकरारानुसार पशुखाद्य पुरवठा करावा.

५. लाभधारकाकडील त्याच्या हिश्श्याची रक्कम आणि शासनाच्या अनुदानाची रक्कम मिळून खाद्याची रक्कम अदा करावी.

६. भारतीय मानक संस्थेच्या प्रमाणकानुसार खाद्यामध्ये मॉइश्चरचे प्रमाण १० टक्के, क्रुड प्रोटोन प्रमाण २० टक्के, क्रुड फायबरचे प्रमाण १३ टक्के, क्रुड फॅटचे प्रमाण २.५ टक्के, ॲसिड इन्सोल्यूबल ॲश ४ टक्के, सॉल्ट प्रमाणे २ टक्के, कॅल्शियम प्रमाण ०.५ टक्के, फॉस्फरस प्रमाण ०.५ टक्के प्रमाणे असणे आवश्यक आहे.

७. क्षार मिश्रण, अ जीवनसत्व, कृमीनाशके इ.चा पुरवठा तसेच लाळखुरकुत लसीकरण करण्यासाठी इतर योजने अंतर्गत उपलब्ध पुरवठयातून सदरील कालवड/पारडीस प्राधान्य देण्यात यावे.

८. सदरील योजने अंतर्गत कालवडीचा/पारडीचा विमा उतरवणे बंधनकारक आहे. लाभार्थीकडून विमा हप्त्याची रक्कम वसूल करुन नंतरच विमा अनुदानाची रक्कम अदा करण्यात यावी. विमा हप्ता अनुदान खलीलप्रमाणे असेल.

९. विमा उतरविताना धरावयाची जनावराची आधारभूत किंमत पुढीलप्रमाणे गृहित धरावी, यासाठी प्रत्येक वर्षासाठी किंमत रुपये (विण्याच्या वेळची)

संकरीत जर्सी कालवड रुपये ११,२००/-
संकरीत एच.एफ. कालवड रुपये ११,२००/-
सुधारीत म्हैस पारडी रुपये १४,०००/-

| विमा हप्ता दर २.२५ | बँकेचे कर्ज नसेल तेव्हा | बँकेचे कर्ज असेल तेव्हा |
|---|---|---|
| १. लाभार्थी | १.२५ | १.०० |
| २. अनुदान | १.०० | ०.७५ |
| ३. कर्जातून | -- | ०.५० |

१०. लाभार्थीचे बँकेचे कर्ज प्रकरण तयार करावयाचे असल्यास ते करण्यास पशुधन विकास अधिकारी (विस्तार) मदत करतील.

११.प्रत्येक लाभधारकास प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणासाठी रु . १००.०० खालीलप्रमाणे खर्च करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| अ | प्रति दिन रु.२५/- प्रमाणे (तीन दिवस प्रशिक्षण भत्ता) | रु.७५/- |
| ब | प्रशिक्षणार्थीस त्याच्या गावाहून प्रशिक्षण केंद्रावर येण्या-जाण्याचा प्रत्यक्ष प्रवास खर्च किंवा जास्तीत जास्त रु.१५ यापैकी जे कमी असेल ते | रु.१५/- |
| क | स्टेशनरी व किरकोळ खर्च | रु.१०/- |
| | एकूण | रु.१०० |

१२. प्रशिक्षण गट पातळीवर आयोजित करावे. त्यासंबंधी अभ्यासमक्र म इत्यादीसाठी सविस्तर सूचना सोबतच्या परिशिष्टामध्ये देण्यात आलेले आहे. हे प्रशिक्षण इतर प्रशिक्षणाप्रमाणे राहील. विशेष भर वासरांच्या संगोपनावर प्रात्यक्षिके दाखविण्यात यावीत.

**योजनेचे अंमलबजावणी अधिकारी**

१. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद हे योजनेचे अंमलबजावणी अधिकारी असतील.
२. लाभार्थीचे अर्ज, कालवडी/पारडी संबंधी सर्व पहाणी, कागदपत्रे, प्रशिक्षण देण्याची योजना गट पातळीवर पशुधन विकास अधिकारी (विस्तार) करतील.
३. लाभार्थीची प्रकरणे दरमहा मासिक बठकीचे वेळी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) करतील.
४. लाभार्थीचे प्रकरण तपासणे, मंजूर करुन अनुदान काढणे, लाभधारकाकडील हिस्सा जमा करणे, नोंद वहीत नोंद करणे, पशुखाद्याचा पूरवठा करणे, खाद्याची रक्कम खाद्यपुरवठा करणाऱ्या संस्थेस अदा करणे याची सर्व जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेवर राहील. कालवड/पारडीची नियमीत आरोग्य तपासणी तसेच कालवड/पारडीची वाढ योग्य रितीने होते किंवा नाही याची तपासणी करणे, रोगप्रतिबंधक लसी देणे कालवड/पारडीचा विमा उतरविणे, कालवड/पारडीचा मृत्यू झाल्यास विवमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळवून देणे, इत्यादी कामे देखील संबंधित जिल्हा परिषद पार पाडेल.
५. या योजनेचे सर्वेक्षण व पर्यवेक्षणाचे काम जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त करतील.
६. दारिद्रय रेषेखलील पात्र लाभार्थीचे अर्ज, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने मान्य केलल्या विहीत नमुन्यात पशुधन विकासस्तार अधिकारी (विस्तार) हे अर्जदारांकडून भरुन घेतील.

**योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापन**

१. योजनेचे अंमलबजावणी अधिकारी यांनी योजनेची अंमलबजावणी संबंधित जिल्हयाचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे सहनिरीक्षणाखली व जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाचे या विषयातील तज्ञ यांचे सहकार्याने करावी.

२. लाभार्थी ची निवड व त्यांना अनुदान रुपात खाद्य पुरवठा विहित निकषाप्रमाणे जिल्हा परिषदेकडून करण्यात यावा.
३. या योजनेच्या कार्यान्वयाचे सर्वेक्षण व पर्यवेक्षणाचे काम जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे करण्यात यावे.
४. खाद्यवाटप तक्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कालवडीला / पारडीला खाद्य पुरवठा करणे अपेक्षित आहे. ज्या जिल्हयात खाद्य वाटपाच्या कार्यक्रमामध्ये खंड पडलेला असेल अशा ठिकाणी सदरहू कालावधी वगळून पुढे खाद्या वाटप करण्यात यावे. खंडित कालावधीमध्ये लाभार्थ्याने कालवडीस/पारडीस खाद्य देणे अपेक्षित आहे.
५. योजना यशस्वीपणे राबविणे, पशुखाद्य पुरविणे, त्याबाबत नोंदी ठेवणे तसेच योजनेवर देखरेख ठेवणे ही जबाबदारी सबंधित जिल्हा परिषदेवर राहील.
६. रोजगार/स्वयंरोजगार योजनेखाली पुरविलेल्या दुधाळ जनावरांच्या (संकरीत गायी/सुधारीत म्हशी) कालवडींना/पारडयांना विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम या योजनाचा लाभ प्राधान्याने द्यावा.
७. योजनेमध्ये निनवडलेल्या लाभार्थ्याची यादी माहिती फलकावर व विवभागाच्या वेबसाईटवर प्रसिसध्द करावी तसेच सदरची यादी MPSIMS या प्रणालीवरीलही नोंदविवण्यात यावी.
८. विभागीय आयुक्तालयातील उपायुक्त (नियोजन)/जिल्हा नियोजन अधिकारी तसेच इतर अधिकारी जेव्हा क्षेत्रीय भेटी देतात तेव्हा त्यांनी यादीतील लाभार्थ्यांची माहिती तपासावी.

**आयुक्त पशुसंवर्धन**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-०७**

**प्रतः- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

(२ ते ८) मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, विभाग सर्व.

(९ ते ३८) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सर्व

(३९ ते ७२) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व

(७३) कार्यासन अधिकारी पसं ६ यांना माहितीसाठी..

**<u>अर्जाचा नमुना</u>**

| साक्षांकीत छायाचित्र |
|---|

प्रति,

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा /जिल्हा परिषद,
जि. .......................

**विषय: वार्षिक योजना २०१४-१५ विशेष घटक योजने अंतर्गत (अनुसुचित जाती/नवबौध्द लाभार्थींना) पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणे या योजने अंतर्गत लाभ मिळणेबाबत...**

महोदय,

मी खाली सही करणार अर्जदार नाव श्री./सौ. -------------------------------------- मु.पो. ------------------ ता. ------------------ जि. ------------------ विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते की, मी बिगर आदिवासी, आदिवासी क्षेत्राबाहेरील आहे. तरी मला आपल्या विभागाकडील **विशेष घटक योजने अंतर्गत पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणेबाबतच्या** योजनेचा लाभ मिळावा ही विनंती.

**विशेष घटक योजने अंतर्गत पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण** योजनेचा लाभ मिळावा.

दिनांक :

अर्जद ार ाचे नाव व सही

संदर्भः महाराष्ट्र शासन क्र मांक- जिवायो २०११ /प्र.क्र .-३०५ /नदु-४, मं., मुं - ३२, दिनांक २२ नोव्हेंबर २०११.

जावक क्र मांकः पशुधन-१/जि..दु.ज.ग.वा.यो./मा.सू./४३३३-४४०८/२०१३, पं.स.-१३, पुणे -०१, दिनांक ५/७/२०१३

**मार्गदर्शक सूचना २०१३-१४**

१. उपरोक्त शासन निर्णयामधील सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना, अटी, शर्ती व अनुदान रकमेच्या मर्यादेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२. लाभार्थ्यांच्या अर्जाचा नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे. नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत प्राप्त अर्जांपैकी ज्या लाभार्थ्यांची निवड झालेली नाही व जिल्हास्तरीयअनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरीलआदिवासी योजनेंतर्गत लाभ घेण्यास तयार आहेत अशा लाभार्थ्यांना संदर्भिय शासन निर्णयातील निकषान्वये व त्यांच्या निवड यादीतील क्र मानुसार व तरतुदीस अधीन राहून, लाभार्थ्यांची संख्या निश्चित करु न लाभ देण्यासाठी निवडावे.

३. लाभार्थी निवडताना ३ टक्के लाभार्थी विकलांग प्रवर्गातील असावेत.

४. लाभार्थी निवडताना ३० टक्के महिला लाभार्थी निनवडीस प्राधान्य देण्यात यावे.

५. लाभार्थ्यांकडून घ्यावयाच्या बंधपत्राचा मसुदा सोबत जोडला आहे. त्यानुसार ०२ दुभत्या जनावरांचे गट प्रत्यक्ष खरेदी करण्यापूर्वी लाभार्थ्यांकडून बंधपत्र करु न घ्यावे.

६. सदरचा शासन निर्णय व अनुषंगिक मार्गदर्शक सूचना पशुसंवर्धन खात्याच्या संकेतस्थळावर (www.ahd.maharashtra.gov.in) उपलब्ध करु न देण्यात येत आहेत..

७. योजनेंतर्गत ०२ दुभत्या जनावरांचे गटासआवश्यक निवारा,पुरेसा चारा, खाद्य व पाणी याची व्यवस्था लाभार्थ्याने स्वबळावर करावी.

८. लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर व त्यांनी स्वतःच्या हिश्श्याची रक्क म उभारु न त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर ०२ दुभत्या जनावरांचे गट खरेदीसाठी विहीत शासकीय अनुदानाची रक्क म संबंधित बँकेकडे (लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यात) वर्ग करण्यात यावी.

९. जे लाभार्थी बँकेमार्फत कर्जाची रक्कम उभारणार नाहीत व स्वत: रक्कम उभी करतील , अशा लाभार्थ्यांच्या हिश्श्याच्या रक्कमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) योजनचे अंमलबजावणी व आहरण-सवितरण अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांचे नावे काढावा. खरेदीच्या वेळी लाभार्थ्याच्या हिश्श्याची रक्कम व शासकीय अनुदानाची रक्कम असा एकत्रित निधी पशुधनाची करणाऱ्या समितीमधील संबंधित पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांच्याकडे सुपूर्द करावा.

१०. ०२ दुभत्या जनावरांचे गट खरेदी समितीमध्ये अंतर्भूत असलेले अन्य सदस्य यांनी ०२ दुभत्या जनावरांचे गट खरेदी करण्यासाठी केलेल्या प्रवासाचा खर्च स्वत: करावयाचा आहे.

११. ०२ दुभत्या जनावरांचे गट खरेदी केल्यानंतर या जनावरांची लाभार्थीच्या गावापर्यंत वाहतूक व आवश्यकतेनुसार ०२ दुभत्या जनावरांचे गटाच्या ट्रांझिट विम्याचा येणारा खर्च लाभार्थीने स्वत: करावयाचा आहे.

१२. योजनेमध्ये वाटप केलेल्या जनावरे मृत झाल्यास विम्याच्या पैशातून संबंधित प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांच्या मान्यतेने लाभार्थ्यांना दुसरे जनावर खरेदी करुन पुरविण्यात यावे.

१३. लाभार्थ्यांनी दुभत्या जनावरांचे पालन/संगोपनाचे प्रशिक्षण घेतलेले नसल्यास लाभार्थ्यींना एक दिवसाचे नि:शुल्क प्रशिक्षण शक्यतो जिल्हा/तालुका स्तरावर देण्यात यावे.

१४. वनक्षेत्रा नजिकच्या कार्यक्षेत्रांतर्गत लाभार्थीची निवड करताना त्यांना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची दक्षते घेण्याबाबत अवगत करावे.

१५. योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मासिक, त्रैमासिक, वार्षिक व फलनिष्पत्ती अहवाल जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांचे मार्फतीने खात्यास सादर करावा. राज्यस्तरावर आयुक्त पशुसंवर्धन योजनेचे सनियंत्रण करतील.

१६. योजनेची देयके आहरीत करताना लाभधारकांची यादी निश्चित करुन योग्य त्या तपशीलासह देयकासोबत जोडल्याशिवाय अनुदाने आहरीत करण्यात येऊ नये.

१७. योजनेचा अहवाल अतिरीक्त आयुक्त पशुसंवर्धन यांचे अभिप्रायासह वार्षिक प्रशासन अहवालामध्ये समावेश करण्याची जबाबदारी सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) यांची राहील.

१८. सन २०१३-१४ मध्ये वितरीत निधी चे उपयोगिता प्रमाणपत्र पुढील आर्थिक वर्षाच्या एप्रिल महिन्यात सादर करणे बंधनकारक राहील.

१९. तसेच आदिवासी उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना अंतर्गत प्रस्तुत योजनेच्या लाभार्थ्यांची यादी, खर्च व मुल्यमापन अहवाल आयुक्त, आदिवासी विकास

विभाग, नाशिक तसेच अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग व प्रकल्प अधिकारी यांचेकडे पाठवावा.

२०. आर्थिक वर्ष संपल्यानंतर योजनेच्या विभागीय स्तरावर मुल्यमापनासाठी समिती खालीलप्रमाणे आहे.

**विभागस्तरावरील प्रस्तूत योजनेची मुल्यमापन समिती**

| | |
|---|---|
| १. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त | अध्यक्ष |
| २. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त मुख्यालयाचे | सदस्य |
| ३. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालय | सदस्य |
| ४. प्रक्षेत्र व्यवास्थापक, विभागातील शेळी-मेंढी महामंडळाचे प्रक्षेत्र | सदस्य |
| ५. पशुधन विकास अधिकारी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालय | सदस्य सचिव |

२१. राज्यस्तरावर आयुक्त पशुसंवर्धन हे योजनेचे मुल्यमापन करु न अभिप्रायासह अहवाल शासनास सादर करतील.

सहपत्र - वरीलप्रमाणे

**आयुक्त पशुसंवर्धन**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-०७**

**प्रतः- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे-१६ यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

(३ ते ९) मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, विभाग सर्व.

(१० ते ३९) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सर्व.

(४० ते ७३) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.

(७४) कार्यासन अधिकारी पसं ६ यांना माहितीसाठी..

## निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्याकडून घ्यावयाच्या बंधपत्राचा नमुना

मी श्री./श्रीमती/कु. -------------------- रा. -------------------- ता. -------------------- जि. ------------------ प्रतितज्ञापूर्वक लिलहून देतो/देते की, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, ------------------------ यांचेकडून महाराष्ट्र राज्य शासनाच्या पशुसंवर्धन खात्यामार्फ त राबविवण्यात येणाऱ्या **जिल्हास्तरीय अनुसूचित उपयोजना/आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने अंतर्गत ०२ दुभत्या जनावरांवरांचे गट वाटप करणे** योजने अंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जिल्हा ----------------- यांचेमार्फत आज दिनांक ----------- रोजी माझे प्रकरण मंजूर झाले असून, त्यानुसार मी शासनाने विहीत केलेल्या पध्दतीस अनुसरुन मला लागू असलेल्या ७५ टक्के अनुदानावर ०२ दुभत्या जनावरांचे गट खरेदी करीन..

१. सदर योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या दुभत्या जनावरांचे योग्य तऱ्हेने पालनपोषण करुन माझ्या कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांचा उपयोग करेन.

२. अनुदानावर प्राप्त झालेल्या गटातील ०२ दुभत्या जनावरांचे गट पशुसंवर्धन खात्याच्या अधिकाऱ्यांना तपासणीकरीता आवश्यक त्या वेळेस दाखविण्याची जबाबदारी माझ्यावर आहे व मी ती पार पाडेन.

३. अनुदानावर प्राप्त झालेली दुभते जनावर आजारी पडल्यास अथवा पशुवैद्यकाची गरज पडल्यास नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात घेऊन जाईन व त्यांच्या सल्ल्यानुसार उपचार करुन घेईन.

४. या योजने अंतर्गत प्राप्त झालेली दुभती जनावरे ३ वर्षे योग्य रितीने सांभाळणे व त्यापासून दुग्ध व्यवसाय करणे माझेवर बंधनकारक आहे. या दरम्यान विमा काढलेल्या जनावरांचा विम्याचा बिल्ला कानातून पडल्यास त्याबाबत त्वरीत बँक/विमा कंपनी/पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांना कळविणे माझेवर बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे .

५. अनुदानावर प्राप्त झालेल्या दुभते जनावर मृत पावल्यास नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यास सूचित करुन मृत जनावराचे शवविच्छेदन करुन घेईन व विमा रकमेतून त्या ऐवजी दुभते जनावर खरेदी करणे माझेवर बंधनकारक राहील.

६. अनुदानावर प्राप्त झालेल्या जनावरांना साथीच्या रोगांपासून संरक्षण मिळण्यासाठी वेळोवेळी लसीकरण करुन घेण्याची जबाबदारी माझ्यावर राहील.

७. मी अनुदानावर प्राप्त झालेली जनावरे पशुसंवर्धन खात्याचे अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय विकणार नाही.

८. आम्ही पती/पत्नीपैकी कोणीही शासकीय/निम शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवानिवृत्त नाही.

९. मला या अथवा तत्सम (शेळी गट वाटप) योजनेचा लाभ मिळालेला नाही.

**या बाबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून, शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाचा मी गैर उपयोग केल्याचे आढळून आल्यास माझेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची मला जाणीव आहे .**

साक्षीदाराची स्वाक्षरी, नाव
व पूर्ण पत्ता

लाभार्थीची स्वाक्षरी:
लाभार्थीचे नाव:

**१.**

**२.**

प्रतिस्वाक्षरीत

पशुधन विकास अधिकारी (विस्तार)
पंचायत समिती -----------------------------
ता------------------ जि------------------

**जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने अंतर्गत ०२ दुभत्या जनावरांचे गट वाटप करणे**

**<u>लाभार्थीने करावयाच्या अर्जाचा नमुना</u>**

| |
|---|
| मागील ३ महिन्यातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र येथे चिकटवावे |

१. अर्जदाराचे नाव : श्री / श्रीमती / कु . ----------------------------------------
(फोटो ओळखपत्राची सत्यप्रत जोडावी)

२. पत्रव्यवहाराचा पत्ता : गावाचे नाव (मु. पो.) ----------------------------------
तालुका ------------ जिल्हा -------------- पिनकोड --------
संपर्कासाठी अर्जदाराचा दूरध्वनी / भ्रमणध्वनी नं ---------------

३. अर्जदाराचे वय : (पूर्ण वर्षामध्ये) ---------------------

४. लिंग : स्त्री / पुरुष (लागू असेल त्यावर √ खूण करावी)

४. अर्जदार दारिद्रयरेषेखालील आहे का? : होय / नाही (लागू असेल त्यावर √ खूण करावी) असल्यास दारिद्रयरेषेखाली असल्याचा दाखला जोडवा.

५. कुटुंब सदस्य संख्या : पुरुष --------- महिला ---------- एकूण ----------

६. अर्जदाराच्या मालकीची स्वतःची शेतजमीन आहे का? होय / नाही (लागू असेल त्यावर √ खूण करावी) असल्यास तपशील: ----------- एकर ------------ गुंठे (७/१२ उतारा जोडावा) अर्जदाराची स्वतःची जमीन नसल्यास दुभत्या जनावरांसाठी वाडा बांधावयाच्या

जागेचा ७/१२ उतारा व जमीन मालकाचे संमतीपत्र जोडावे. चारपिके घेण्यासाठी सिसंचन व्यवस्था उपलब्ध आहे का? होय / नाही (लागू असेल त्यावर √ खूण करावी)

७. अर्जदाराकडे सध्या उपलब्ध असलेल्या पशुधनाचा तपशील:

| अ.क्र. | तपशील | संख्या | अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | संकरीत गायी | | ४. | मुऱ्हा/मेहसाना/सुरती म्हशी | |
| २. | गावठी गायी | | ५. | शेळया उ.बादी, संगमनेरी, स्थानिक | |
| ३. | शेतीकाम/ओढकामाचे बैल | | ६. | मेंढया - डेक्कनी, माडग्याळ | |

८. अर्जरदाराकडे दुभत्या जनावरांसाठी गोठा उपलब्ध आहे का? होय / नाही असल्यास किती जनावरांसाठी -------------
अस्तित्वातील गोठयाचा प्रकार: कच्चे बांधकाम/पक्के बांधकाम/गवती छपराचे छत (लागू असेल त्यावर √ खूण करावी)

९. अर्जदाराने दुग्ध व्यवसाय विषयक प्रशिक्षण घेतले आहे का? होय / नाही (असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी).

१०. अर्जदार अनु. जाती/आदिवासी प्रवर्गातील आहे का? होय / नाही (लागू असेल त्यावर √ खूण करावी) असल्यास जातीच्या दाखल्याची प्रत जोडावी.

११. अर्जदार बचत गटाचा सदस्य आहे का? होय / नाही (लागू असेल त्यावर √ खूण करावी) असल्यास बचत गटाचे नाव व पत्ता ----------------------------------------------
बचत गट ज्या क्षेत्रात काम करीत आहे त्याचा उल्लेख करावा.------------------------.

१२. अर्जदार सुशिक्षित बेरोजगार आहे का? होय / नाही (लागू असेल त्यावर √ खूण करावी) असल्यास सेवायोजन कार्यालयाच्या नोंदणीपत्राची प्रत जोडावी.

१३. या योजनेअंतर्गत माझे प्रकरण मंजूर झाल्यास त्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिश्श्याची रक्क म मी स्वत: उभी करण्याची हमी देत आहे/बँकेकडू न कर्ज मंजूर करुन घेण्याची जबाबदारी माझेवर राहील. माझ्या हिश्याची रक्कम मी उभारल्याशिवाय मला योजनेचा लाभ मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.

१४. कर्जासाठी बँकेचे नाव व शाखा ------------------------------------

प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती पूर्णपणे सत्य आहे. या माहितीमध्ये कोणतीही असत्यता आढळल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर राहील व त्यामुळे मी उक्त योजनेचा लाभ मिमळण्यास अपात्र ठरेन अथवा मला योजनेखाली मंजूर करण्यात आलेल्या लाभाची वसूली माझेकडून करण्यात येईल याची मला जाणीव आहे व त्यास माझी पूर्ण संमती आहे.

अर्जदाराची सही/अंगठा

अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

१. फोटो ओळखपत्राची सत्यप्रत

२. दारिद्रय रेषेखाली असल्याचा दाखला

३. ७/१२ व ८-अ उतारा आणि ग्रामपंचायत नमुना नं. ८

४. प्रशिक्षण घेतले असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत

५. जातीच्या दाखल्याची सत्यप्रत

६. बचत गट सदस्य असल्यास प्रमाणपत्र

७. रोजगार-स्वयंरोजगार कार्यालयाचे नाव नोंदणी कार्डची सत्यप्रत

८. अपत्य दाखला (ग्रामपंचायत दाखला)

प्रमाणपत्र:

प्रमाणित करण्यात येते की, अर्जदार श्री. श्रीमती/कु. ---------------------------------- यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या माहिती पैकी प्रत्यक्ष पडताळणी करावयाच्या बाबींची संबंधितांचे घरी जाउन प्रत्यक्ष पडताळणी केली आहे . त्या नुसार नमूद तपशील बरोबर आहे.

स्वाक्षरी/-

डॉ/ श्री .

सहा. आयुक्त पशुसंवर्धन, तालपसचि-------------/

पविअ, पवैद श्रेणी-१ ----------------------------/

१५. सहा.पविअ/प.प., पवैद श्रेणी-२--------------------/

# <u>अर्जाचा नमुना</u>

| |
|---|
| साक्षांकीत छायाचित्र |

प्रति,

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद,
जि. .......................

**विषय : जिल्हा वार्षिक योजना २०१४-१५ (सर्वसाधारण योजना) अंतर्गत विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रमांतर्गत संकरीत/देशी गोवंशीच्या कालवडी व सुधारीत/देशी म्हशीच्या पारडयांची जोपासना करण्यासाठी अर्थसहाय्य या उपयोजनेचा लाभ मिळणेबाबत...**

महोदय,

मी खाली सही करणार अर्जदार नाव श्री./सौ. ---------------------------------------- मु.पो. ------------------ ता. ------------------ जि. ------------------ विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते की, मला जिल्हा वार्षिक योजना २०१४-१५ (सर्वसाधारण योजना) अंतर्गत संकरीत कालवडी व सुधारीत म्हशीच्या पारड्यांची जोपासना करण्यासाठी विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम योजनेचा लाभ मिळावा ही विनंती.

तरी महोदयांना विनंती की, मला सन २०१४-१५ या वर्षात वर नमुद केलेल्या योजनेंतर्गत विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम या योजनेचा लाभ मिळावा.

दिनांक :

अर्जद ार ाचे नाव व सही

## **अर्जाचा नमुना**

| |
|---|
| साक्षांकीत छायाचित्र |

प्रति,

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद,
जि. ......................

**विषय : जिल्हा वार्षिक योजना २०१४-१५ मध्ये आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना अंतर्गत संकरीत कालवडी व सुधारीत म्हशीच्या पारड्यांची जोपासना करण्यासाठी विशेष पशुधन उत्पादन कार्यक्र म अंतर्गत लाभ मिळावा ही विनंती.**

महोदय,

मी खाली सही करणार अर्जदार नाव श्री./सौ. ----------------------------------------- मु.पो. ------------------ ता. ------------------ जि. ------------------ विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते की, मला मध्ये आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना अंतर्गत संकरीत कालवडी व सुधारीत म्हशीच्या पारड्यांची जोपासना करण्यासाठी विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम अंतर्गत लाभ मिळावा ही विनंती.

तरी महोदयांना विनंती की, मला सन २०१४-१५ या वर्षात वर नमुद केलेल्या योजनेंतर्गत विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम या योजनेचा लाभ मिळावा.

दिनांक :

अर्जद ार ाचे नाव व सही

प्रति,

मा.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

विषय : जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत ५०% अनुदानावर संकरीत गाय मिळणेबाबत...

महोदय,

मी खाली सही करणार अर्जदार श्री/सौ ------------------------------------------------------ रा. ------------------ ता. अलिबाग जि. रायगड विनंतीपूर्वक अर्ज करतो की मला जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत ५०% अनुदानावर संकरीत गाय पुरविण्यात यावी. त्यासाठी शासनाने ठरवून दिलेले नियम व अटी मला मान्य असून अनुदान प्राप्त होण्यासाठी लागणारी पुढील कागदपत्रे/प्रमाणपत्रे इ. सोबत जोडली आहेत.

शासनाने घालून दिलेल्या अटीप्रमाणे लाभार्थी स्वहिस्सा रु.१५,०००/- (अक्षरी रु.पंधरा हजार मात्र) मी भरण्यास तयार आहे.

१. जमिनीचा ७/१२ उतारा.
२. १ मे २००१ नंतर तिसरी संतती नसल्याबाबतचा दाखला.
३. शौचालयाचा वापर करत असल्याबाबतचा दाखला.
४. अर्जासोबत पासपोर्ट साइजचे साक्षांकीत केलेले छायाचित्र जोडले आहे.
५. गाय / म्हैस यांची खरेदी, खरेदी समितीने निवडलेल्या ठिकाणावरुन केल्यानंतर जनावर घरपोच आणण्यासाठी होणार ा वाहतूकीचा खर्च तसेच जनावर ाचा विमा उतरविण्यासाठी होणार ा खर्च मी स्वत: करेन.

तरी मला योजनेचा लाभ मिळावा ही विनंती.

आपला विश्वासू

ठिकाण : नाव

दिनांक : (अर्जद ही)

प्रति,

मा.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

विषय : जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत ५०% अनुदानावर म्हैस मिळणेबाबत...

महोदय,

मी खाली सही करणार अर्जदार श्री ---------------------------------------------- रा. ----------------- ता. अलिबाग जि. रायगड विनंतीपूर्वक अर्ज करतो की मला जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत ५०% अनुदानावर म्हैस पुरविण्यात यावी. त्यासाठी शासनाने ठरवून दिलेले नियम व अटी मला मान्य असून अनुदान प्राप्त होण्यासाठी लागणारी पुढील कागदपत्रे/प्रमाणपत्रे इ. सोबत जोडली आहेत.

शासनाने घालून दिलेल्या अटीप्रमाणे लाभार्थी स्वहिस्सा रु.२०,०००/- (अक्षरी रु.वीस हजार मात्र) मी भरण्यास तयार आहे.

१. जमिनीचा ७/१२ उतारा.
२. १ मे २००१ नंतर तिसरी संतती नसल्याबाबतचा दाखला.
३. शौचालयाचा वापर करत असल्याबाबतचा दाखला.
४. अर्जासोबत पासपोर्ट साइजचे साक्षांकीत केलेले छायाचित्र जोडले आहे.
५. म्हशीची खरेदी, खरेदी समितीने निवडलेल्या ठिकाणावरुन केल्यानंतर जनावर घरपोच आणण्यासाठी होणारा वाहतूकीचा खर्च तसेच म्हशीचा विमा उतरविण्यासाठी होणारा खर्च मी स्वतः करेन.

तरी मला योजनेचा लाभ मिळावा ही विनंती.

आपला विश्वासू

ठिकाण : नाव

दिनांक :　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　(अर्जद ार ाचे नाव व सही)

प्रति,

मा.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

विषय : जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत प्लॅस्टीक किटली, बादली व घमेले पुरवठा होणेबाबत...

महोदय,

मी श्री./श्रीम. ------------------------------------------------ रा. ---------------- ता. ---------------- जि. रायगड विनंती अर्ज करतो की मला जि.प. सेस योजनेंतर्गत ७५% अनुदानावर १० ली. प्लॅस्टीक किटली, बादली व घमेले संच पुरवठा व्हावा.

सोबत खालील दाखले जोडले आहेत.

१. १ मे २००१ नंतर २ पेक्षा जास्त अपत्य नसल्याबाबतचा दाखला.
२. वैयक्तिक शौचालय असून त्याचा वापर करत असल्याबाबतचा दाखला.

आपला विश्वासू

(सही-/)

ठिकाण :　　　　　　　　　　　　　　नाव : --------------------

दिनांक :　　　　　　　　　　　　　　पत्ता : --------------------

सदर अर्ज मंजूर करण्यास शिफारस आहे.

पशुधन विकास अधिकारी (विस्तार)　　　　पशुधन पर्यवेक्षक/सहा. पशुधन विकास अधिकारी

पंचायत समिती

पशुधन विकास अधिकारी
पशुवैद्यकीय दवाखाना ---------

प्रति,

मा.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

विषय : जिल्हा नियोजन समिती नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत ७५% अनुदानावर बहुपयोगी सौर कंदिल मिळणेबाबत...

महोदय,

मी खाली सही करणार अर्जदार श्री/सौ ------------------------------------------- रा. ------------------ ता. अलिबाग जि. रायगड विनंतीपूर्वक अर्ज करतो की मला जिल्हा नियोजन समिती नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत ७५% अनुदानावर बहुपयोगी सौर कंदिल पुरविण्यात यावा. त्यासाठी शासनाने ठरवून दिलेले नियम व अटी मला मान्य असून अनुदान प्राप्त होण्यासाठी लागणारी पुढील क ागदपत्रे/प्रमाणपत्रे इ. सोबत जोडली आहेत.

शासनाने घालून दिलेल्या अटीप्रमाणे लाभार्थी स्वहिस्सा रु.-----/- (अक्षरी रु.--------- मात्र) मी भरण्यास तयार आहे.

१. जमिनीचा ७/१२ उतारा.
२. १ मे २००१ नंतर तिसरी संतती नसल्याबाबतचा दाखला.
३. शौचालयाचा वापर करत असल्याबाबतचा दाखला.
४. अर्जासोबत पासपोर्ट साइजचे साक्षांकीत केलेले छायाचित्र जोडले आहे.
५. माझ्याकडे --- गाई, --- म्हशी असून मी दुग्धव्यवसायिक आहे. मी/माझ्या कुटुंबीयांपैकी कुणीही मागील ३ वर्षात या योजनेचा लाभ घेतलेला नाही. तरी मला योजनेचा लाभ मिळावा ही विनंती.

आपला विश्वासू

(सही-/)

ठिकाण : नाव : --------------------

दिनांक : पत्ता : --------------------

सदर अर्ज मंजूर करण्यास शिफारस आहे.

पशुधन विकास अधिकारी (विस्तार)
पंचायत समिती--------------

पशुधन पर्यवेक्षक/सहा. पशुधन विकास अधिकारी
पशुधन विकास अधिकारी
पशुवैद्यकीय दवाखाना ---------

जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण महिलांसाठी ८ आठवडयांच्या सुधारीत गावठी तलंगांचे ७५% अनुदानावर वाटप योजनेसाठी करावयाचा अर्ज.

प्रति,

मा.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

अर्जदाराचे नांव:
अर्जदाराचा पूर्ण पत्ता:

अर्जदाराचा फोटो

महोदय,

मी श्रीमती ---------------------------------- रा. ------------------ ता. ------------- जि. रायगड विनंती करते की मला जि.प. सेस फंड अंतर्गत ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण फक्त महिलांसाठी ८ आठवडयांचा सुधारीत गावठी तलंगांचे ७५% अनुदानावर वाटप योजनेचा लाभ देण्यात यावा ही विनंती.

सोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करण्यात येत आहे.

१. परिपूर्ण अर्ज व अर्जावर साक्षांकीत छायाचित्र.
२. ग्रामसेवकाचा दाखला - रहिवासी शौचालय व अपत्य दाखला.

अर्जदराची स्वाक्षरी

(सही-/)

ठिकाण : नाव : --------------------

दिनांक : पत्ता : --------------------

सदर अर्ज मंजूर करण्यास शिफारस आहे.

पशुधन विकास अधिकारी (विस्तार)
पंचायत समिती-------------

पशुधन पर्यवेक्षक/सहा. पशुधन विकास अधिकारी
पशुधन विकास अधिकारी

पशुवैद्यकीय दवाखाना ---------

# <u>मार्गदर्शक सूचना</u>

## <u>नैसगिक व आपात्कालीन परिस्थतीमध्ये पशुपालकांना तात्काळ अर्थसहाय्य</u>

१. परिपूर्ण अर्ज व अर्जावर साक्षांकित्त छायाचित्र तसेच मृत जनावराचे/वाडयाचे छायाचित्र.

२. शव विच्छेदनाची आवश्यकता नाही. किंतु पशुधन विकास अधिकारी यांनी दिलेला मृत जनावराचा मृत्युचा दाखला आवश्यक.

३. पोलीस पाटील/सरपंच व इतर किमान ५ व्यक्तींचा पंचनामा दाखला आवश्यक.

४. ग्रामसेवकाचा दाखला - मृत पशुच्या मालकिचा दाखला, रहिवासी दाखला.

५. अर्जदार शासकीय सेवेत नसावा.

६. मृत पशु मृत्यूपूवी पशुचे वय किमान ३ वर्षे किंवा त्याहून अधिक असल्याचा व पशु उत्पादनक्षम, शेतीच्या कामासाठी उपयोगी असल्याचा पशुधन विकास अधिकारी यांचा दाखला.

७. प्रति पशु / गोठा रु. ५,०००/- व एका लाभार्थीस जास्तीत जास्त रुपये १०,०००/- पर्यंत लाभ देण्यात येईल.

८. या योजनेचा लाभ घेतल्यास दुस-या कुठल्याही सरकारी यंत्रणेकडून त्याच कारणासाठी लाभ घेता येणार नाही.

लाभार्थी निवड समिती

१. अध्यक्ष - मा. उपाध्यक्ष तथा सभापती, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धविकास समिती

२. सचिव - जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

३. सदस्य - विषय समितीचे सर्व मा. सदस्य

## नैसर्गिक व आपत्कालीन परिस्थितीमध्ये पशुपालकांना तात्काळ अर्थसहाय्य योजनेसाठी करावयाचा अर्ज

अर्जदाराचे नांव:

अर्जदाराचा पूर्ण पत्ता:

वाडा कोसळल्याची अथवा जळाल्याची
तारीख व वेळ:

साक्षांकीत छायाचित्र

नैसर्गिक आपत्ती : पूर/आग/अतिवृष्टी/विज कोसळून/वाडा कोसळून/वाडा जळून इत्यादी

मी श्री /श्रीमती ------------------------------ रा. -------------- ता. ------------- जि. रायगड विनंती करतो की माझ्या पशुंचा गोठा/वाडा नैसर्गिक आपत्ती : पूर/आग/अतिवृष्टी/विज कोसळून/कोसळून/जळून नुकसान झाले आहे. तरीही मला जि.प. सेस फंड अंतर्गत नैसर्गिक व आपत्क ालीन परिस्थितीमध्ये पशुपालक ांना तात्काळ अर्थसहाय्य योजनेचा लाभ देण्यात यावा ही विनंती. सोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करण्यात येत आहे.

१. परिपूर्ण अर्ज व अर्जावर साक्षांकीत छायाचित्र तसेच गोठयाचे/वाडयाचे छायाचित्र.
२. पोलीस पाटील/सरपंच व इतर किमान ५ व्यक्तींचा पंचनामा दाखला आवश्यक.
३. ग्रामसेवकाचा दाखला - गोठा/वाडयाच्या मालकीचा दाखला, रहिवासी दाखला.
४. शासकीय सेवेत नसल्याचा दाखला.

अर्जदाराची स्वाक्षरी

*या योजनेचा लाभ घेतल्यास दुसऱ्या कुठल्याही सरकारी यंत्रणेकडून त्याच कारणासाठी लाभ घेता येणार नाही.

**नैसर्गिक व आपत्कालीन परिस्थितीमध्ये पशुपालकांना तात्काळ अर्थसहाय्य**

**योजनेसाठी करावयाचा अर्ज**

अर्जदाराचे नांव:

अर्जदाराचा पूर्ण पत्ता:

जनावर मृत झाल्याची/वाडा कोसळल्याची अथवा जळाल्याची
तारीख व वेळ:

साक्षांकीत छायाचित्र

नैसर्गिक आपत्ती : पूर/आग/अतिवृष्टी/विज कोसळून/सर्पदंश/इलेक्ट्रिक शॉक/वाडा कोसळून/ वाडा जळून इत्यादी

मी श्री /श्रीमती -------------------------------- रा. -------------- ता. ----------- जि. रायगड विनंती करतो की माझी गाय/म्हैस नैसर्गिक आपत्ती : पूर/आग/अतिवृष्टी/विज कोसळून/सर्पदंश/इलेक्ट्रिक शॉक मरण पावलेली आहे. तरीही मला जि.प. सेस फंड अंतर्गत नैसर्गिक व आपत्कालीन परिस्थितीमध्ये पशुपालकांना तात्काळ अर्थसहाय्य योजनेचा लाभ देण्यात यावा ही विनंती. सोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करण्यात येत आहे.

१. परिपूर्ण अर्ज व अर्जावर साक्षांकीत छायाचित्र तसेच मृत जनावराचे/वाडयाचे छायाचित्र.
२. पोलीस पाटील/सरपंच व इतर किमान ५ व्यक्तींचा पंचनामा दाखला आवश्यक.
३. ग्रामसेवकाचा दाखला - गोठा/वाडयाच्या मालकीचा दाखला, रहिवासी दाखला.
४. शासकीय सेवेत नसल्याचा दाखला.

अर्जदाराची स्वाक्षरी

*या योजनेचा लाभ घेतल्यास दुसऱ्या कुठल्याही सरकारी यंत्रणेकडून त्याच कारणासाठी लाभ घेता येणार नाही.